MHKO070007922021

**नियमीत दिवाणी दावा क्र.१४७/२०२१ मधील नि.१४ वरील आदेश**
**(श्री.शिवयोगी पट्टदेवस –विरुध्द– शिरोळ नगरपरिषद तर्फे नगराध्यक्ष वगैरे)**

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र.३ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ अन्वये दाखल केलेला आहे.

**०२.** प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, वादी यांनी शिरोळ नगरपरिषदेच्या स्थायी समितीसमोर दि.११/०१/२०२१ रोजी झालेला ठराव क्र.५६ रद्द करणेविषयी तसेच प्रतिवादी विरुध्द सि.स.नं.२८७०, २८७१ व २८७२ मधील मंदीर, पादुका व विहीर इत्यादीच्या उपभोगास हरकत अडथळा करु नये अशी कायम मनाई मिळणेकरीता दावा दाखल केला आहे. प्रस्तुत कामी प्रतिवादी यांनी कैफियत व म्हणणे दाखल केलेले आहे. वादी यांच्या दाव्यास महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औदयोगिक नागरी अधिनियम १९६५ मधील तरतुदीची बाधा येते. कायदयातील तरतुदीनुसार मिळकत क्र.२८७०, २८७१ व २८७२ या मिळकतीच्या असेसमेंटमध्ये वादी यास नोटीस देवून त्यास म्हणणे मांडण्याची संधी देवून दुरुस्ती केलेली आहे. सदर निर्णयावर वादी यांनी मा.जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्याकडे अपील दाखल केले होते ते नामंजूर झाले असून त्या निर्णयाविरुध्द वादी यांनी मा.अपर आयुक्त, पुणे यांच्याकडे दाखल केलेले आपीलही नामंजूर झाले आहे.

**०३.** प्रतिवादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी यांना स्थायी समितीने केलेल्या ठरावाविरुध्द तसेच असेसमेंटमधील बदलाबाबत दिवाणी दाद मागण्याचा अधिकार येत नाही. तसेच या न्यायालयास अशा स्वरुपाचा दावा चालवण्याचा अधिकार येत नाही. महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औदयागिक नागरी अधिनियम १९६५ कलम ३०८ व अन्य तरतूदीप्रमाणे या न्यायालयास अधिकार येत नाही. वादीचा दावा हा बार्ड बाय लॉ आहे. तसेच वादी यांनी प्रस्तुतचा

दावा कायम मनाईकरीता दाखल केला असून मनाईकरीता वादीने दावेकामी दावेस कारण नमूद केलेले नाही. त्याबाबत प्रतिवादी यांनी त्यांच्या कैफियतमध्ये हरकत घेतलेली आहे. सबब, प्रस्तुतचा दावा काढून टाकण्यात यावी अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

**०४.** वादी यांनी प्रस्तुतच्या अर्जास त्यांचे म्हणणे निशाणी क्र.१५ वर दाखल करुन प्रस्तुत अर्जातील कलम १ मधील मजकूर मान्य करुन उर्वरीत मजकूर मान्य व कबूल नसल्याचे कथन केले आहे. पुढे त्यांनी असे कथन केले आहे की, वादी यांनी दावा हा निरंतर ताकीद व डिक्लरेशनकरीता दाखल केला असून त्यातील कथने व मागणी ही कायदयास धरुन आहे. कोणत्याही स्थावर मालमत्तेवरील टायटलवर एखादी व्यक्ती अथवा संस्था बाधा आणत असेल तर त्यावर केवळ दिवाणी न्यायालयात दाद मागण्याचा नियम असल्याने त्याकरीता विशेष दिलासा कायदा कलम ३४ प्रमाणे वादीने केलेला दावा योग्य आहे. वादी यांनी यापूर्वी केलेले अर्ज नामंजूर झाले नसून सदरचे अर्ज चालवण्याचा अधिकार संबंधीत महसूल खात्यातील जिल्हाधिकारी तसेच आयुक्तांना नसल्याने ते निकाली काढले आहेत. परंतू प्रतिवादी यांनी त्याचा गैरअर्थ पकडून मा.न्यायालयाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रतिवादी केवळ प्रस्तुत प्रकरण लांबवण्याच्या उद्देशाने व सदरची मिळकत हडप करण्याच्या उद्देशाने येनकेन मार्गांनी प्रकरण प्रलंबीत करत आहेत. वादी यांनी दाव्यास योग्य ते कारण आणि योग्य तो स्टॅम्प दिलेला असून दाव्यात नमूद असलेल्या मिळकती तबदील अथवा त्यामध्ये काही बदल करु नये अशी निरंतरची ताकीद मागीतलेली आहे. सबब, प्रतिवादी यांचा प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा अशी विनंती वादी यांनी केलेली आहे.

**०५.** अर्ज, त्यावरील म्हणणे, उभयतांच्या वकीलांचा युक्तीवादद ऐकून खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निघतात. त्यावर मी कारणांसहित निष्कर्ष त्यापुढे नमूद केले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रस्तुतच्या दाव्यास महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औदयागिक नागरी अधिनियम १९६५ कलम ३०८ | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| | व अन्य तरतूदींची बाधा येते काय ? | |
| २. | दाव्यात दावा दाखल करणेचे कारण नमूद केले आहे काय ? | होकारार्थी |
| ३. | प्रस्तुतचा दावा चालणेस पात्र आहे काय ? | होकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**०६.** दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ अन्वये दाखल करण्यात आलेल्या अर्जाचा विचार करत असताना न्यायालयाने वादी यांनी त्याच्या दाव्यात काय कथने केलेली आहेत याचा विचार करणे गरजेचे आहे. अशा वेळी प्रतिवादी यांनी काय बचाव घेतला आहे ही बाब महत्वाची नसते व ती विचारातही घेता येत नाही.

**मुद्दे क्र. १ ते ३ करीता –**

**०७.** मुद्दे क्र.१ ते ३ हे एकमेकांशी निगडीत असल्याने पुनरावृत्ती टाळण्यासाठी सर्व मुद्दे एकत्रीत चर्चेसाठी घेतले आहेत.

**०८.** प्रतिवादी यांच्या विधीज्ञांनी कथन केले की वादी यांना स्थायी समितीने केलेल्या ठरावाविरुध्द तसेच असेसमेंटमधील बदलाबाबत दिवाणी दाद मागण्याचा अधिकार येत नाही. तसेच या न्यायालयास अशा स्वरुपाचा दावा चालवण्याचा अधिकार येत नाही. महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औदयागिक नागरी अधिनियम १९६५ कलम ३०८ व अन्य तरतूदीप्रमाणे या न्यायालयास अधिकार येत नाही. वादी यांना स्थायी समितीने ठरावाच्या विरुध्द कलम ३०८ नुसार जिल्हाधिकारी यांच्याकडे दाद मागता येईल किंवा रिट पिटीशन दाखल करता येईल, परंतू सदर ठरावाच्या विरुध्द दिवाणी न्यायालयात दाद मागता येणार नाही. कारण दिवाणी न्यायालयाचे अधिकारक्षेत्रास बाधा येते. तसेच कायदयातील तरतुदीनुसार मिळकत क्र.२८७०, २८७१ व २८७२ या मिळकतीच्या असेसमेंटमध्ये वादी यास नोटीस देवून त्यास म्हणणे मांडण्याची संधी देवून दुरुस्ती केलेली आहे. सदर निर्णयावर वादी यांनी मा.जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्याकडे

अपील दाखल केले होते ते नामंजूर झाले असून त्या निर्णयाविरुध्द वादी यांनी मा.अपर आयुक्त, पुणे यांच्याकडे दाखल केलेले आपीलही नामंजूर झाले आहे.

०९. प्रतिवादी यांच्या विधीज्ञांनी त्यांच्या युक्तीवादाच्या पुष्टयर्थ खालील न्यायनिवाडयाचा आधार घेतला.

**K.I.P.C. Vistacore Infra Projects J.V. vs. Ichalkaranji Municipal Council and others, 2021(1) ALL MR 157.**

> *" Petitioner being aggrieved party against order of Collector and resolution passed by Municipal Council has locus to file writ peition against it"*

उपरोक्त मा.न्यायालयाच्या न्यायनिवाडयाचे अवलोकन केले असता असे दिसते की सदर प्रकरणात अर्जदार यांनी करारानुसार विहीत कालावधीत काम न केल्याने नगरपालिका यांनी करार रद्द करणेचा ठराव केला व नगराध्यक्ष यांनी दाखल केलेल्या खाजगी तक्रारीची दखल घेवून जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी ठराव तात्पुरता स्थगीत केला. म्हणून अन्याय झालेल्या पक्षकाराला सदर जिल्हाधिकारी यांच्या आदेशाच्या व नगरपालिका यांच्या ठरावाविरुध्द रिट पिटीशन दाखल करण्याचा अधिकार असल्याचे प्रमाण मा.न्यायालयाने यामध्ये दिले आहे.

१०. वादी यांच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की कोणत्याही स्थावर मालमत्तेवरील टायटलवर एखादी व्यक्ती अथवा संस्था बाधा आणत असेल तर त्यावर केवळ दिवाणी न्यायालयात दाद मागण्याचा नियम असल्याने त्याकरीता विशेष दिलासा कायदा कलम ३४ प्रमाणे वादीने केलेला दावा योग्य आहे. वादी यांनी यापूर्वी केलेले अर्ज नामंजूर झाले नसून सदरचे अर्ज चालवण्याचा अधिकार संबंधीत महसूल खात्यातील जिल्हाधिकारी तसेच आयुक्तांना नसल्याने ते निकाली काढले आहेत. वादी यांच्या विधीज्ञांनी त्यांच्या युक्तीवादाच्या पृष्टयर्थ खालील न्यायनिवाडयांचा आधार घेतला –

**1] India Navigation Company v/s. Haryana State Industrial Development Corporation 2005 CJ(P & H)**

**306 Decided on 30/08/2005**

*" Section 34 and 41(4) of Specific Relief Act–the property can be made subject matter of declaration–invitation for allotment of Industrial plots at the Industrial Estate Udyog Gurgaon. A suit for declaration with consequential relief of permanant injunction is maintainable "*

**2] Nilima Bose v/s. Santosh Kumar Ghosh 1996 CJ(Cal) 188.**

प्रस्तुतचा मा.न्यायालयाचा न्यायनिवाडा हा दाव्याच्या मुल्यांकनाबाबत असल्याने त्यातील मार्गदर्शक तत्वे प्रस्तुत अर्ज निकाली काढताना उपयुक्त नाहीत.

**११.** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसते की वादी यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे ठरावाविरुध्द दाद मागीतली होती परंतू महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायती व औदयोगिक नागरी अधिनियम कलम ३०८ नुसार वादी यांचा अर्ज दाखल करुन घेता येत नसलेने वादी यांचा अर्ज निकाली काढण्यात आलेला आहे. तसेच आयुक्त पुणे यांनी देखील अपील चालवण्याची तरतूद कायदयात नसल्याने त्यांनी वादी यांचा अर्ज निकाली काढला. यावरुन असे दिसून येते की वादी यांनी कलम ३०८ नुसार जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज केला होता. परंतू त्यांना दाखल करुन घेता येत नसलेने सदर अर्ज निकाली काढला. त्यामुळे वादी यांच्याकडे दिवाणी न्यायालयाकडे दाद मागण्याशिवाय कोणताही पर्याय नव्हता. तसेच वादी यांनी दावा मिळकतीत त्यांचा मालकी हक्क असल्याने प्रस्तुतचा दावा हक्कज्ञापनाकरीता व मनाईकरीता दाखल केलेला आहे. सदर कायदयामध्ये दिवाणी अधिकार ठरवण्याचे अधिकार कोणलाही नसून ते फक्त दिवाणी न्यायालयास आहेत. त्यामुळे वादी यांनी मागणी केलेली दाद ही फक्त दिवाणी न्यायालयात त्यांना मिळू शकते. त्यामुळे दिवाणी दिवाणी न्यायालयाच्या अधिकार क्षेत्राला बाधा येते असा निष्कर्ष काढता येत नाही.

दिवाणी न्यायालयाला प्रस्तुतच्या दाव्यातील दादी निर्णयीत करण्याचा अधिकार आहे. करीता प्रस्तुत न्यायालयाचे अधिकारक्षेत्राला महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायती व औदयोगिक नागरी अधिनियम कलम ३०८ किंवा इतर तरतूदींनुसार बाधा येत नाही.

**१२.** प्रतिवादी यांनी कथन केले आहे की वादी यांनी प्रस्तुतचा दावा मनाईकरीता दाखल केला आहे. परंतू दावेकामी दावेस कोणतेही कारण नमूद केलेले नाही. परंतू वादपत्राचे अवलोकन केले असता वादी यांनी विशेषतः दाव्याचे कारण नमूद केल्याचे दिसून येत नाही म्हणून मला या मुद्दयात कोणतेही तथ्य दिसून येत नाही. करीता मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवण्यात येतो व मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवण्यात येते.

**<u>मुद्दे क्र.३ व ४ करीता –</u>**

**१३.** मुद्दे क्र.१ व २ च्या निष्कार्षानुसार प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यास पात्र असल्याने व प्रस्तुतचा दावा या न्यायालयात चालणेस पात्र असल्याने मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवण्यात येतो व मुद्दा क्र.४ च्या निष्कर्षाकरीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

प्रस्तुतचा अर्ज (निशाणी क्र.१४) नामंजूर करण्यात येत आहे.

सही/–

ठिकाणः–जयसिंगपूर.

दिनांकः–१४/१०/२०२१.

**( रोहिणी अ. जाधव )**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
जयसिंगपूर.